महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युतपारेषण कंपनी मर्यादित,
CIN No.U40109MH2005SGC153646
कार्यालयाचे नाव — कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
कार्यालयाचा पत्ता — अउदा संवसु विभाग,यवतमाळ "विद्युत भवन" दुसरा मजला, आर्णि रोड,यवतमाळ — ४४५००१
ईमेल — ee1170@mahatransco.in

जा.क्र.काअ/अउदा/संवसु/वि/यवतमाळ/मासं/No 0 1 1 0 5 दिनांक :— 0 4 AUG 2026

# जाहीर सुचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते की, अऊदा संवसू विभाग, महापारेषण यवतमाळ अंतर्गत वर्ष २०२६—२७ करीता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी करारबध्द करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी www.apprenticeshipindia.org या संकेत स्थळावर शिकाऊ उमेदवारी करीता दि. ०६.०८.२०२६ ते १२.०८.२०२६ पर्यंत २३.५९ वाजेपर्यंत खालील नमुद आस्थापना नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज सादर करावे. आस्थापना नोंदणी क्रमांक व शिकाऊ उमेदवारीच्या जागांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | रजिस्ट्रेशन क्रमांक | विजतंत्री (Electrician) |
|---|---|---|---|
| १ | अऊदा संवसू विभाग, यवतमाळ | E-09172700008 | २६ |

१. **शैक्षणिक अर्हता** :—
   १) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.
   २) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात परीक्षा उत्तीर्ण.

२. **शैक्षणिक दस्तावेज**:— १) एस.एस.सी. व आय.टी.आय. विजतंत्री चार सेमिस्टरचे उत्तीर्ण गुणपत्रिकाची मुळप्रत. २) शाळा सोडल्याचा दाखला ३) आधारकार्ड ४) मागासवर्गीय विद्यार्थ्याचे जात प्रमाणपत्र ५) महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र ६) उच्च व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) ७) आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) व सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास प्रवर्ग (SEBC) उमेदवारा करीता तहसीलदार यांनी दिलेले प्रमाणपत्र व इतर सर्व अनुषंगिक आवश्यक कागदपत्रांची मुळप्रत उमेदवाराने स्वत:च्या प्रोफाईलवर स्कॅन करून अपलोड करावे.

३. **विद्यावेतन**:— प्रचलित नियमाप्रमाणे लागु राहील.

४. **नमुद जागांची संख्या कमी** — अधिक करण्याचे व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

५. भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका—यांकडून दबाव आणल्यास त्या उमेदवारास भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

६. उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करताना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र व्यवस्थित रित्या स्कॅन करून योग्य रितीने अपलोड करणे बंधनकारक आहे. वरील कालावधीत ऑनलाईन (Online) अर्ज सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

७. वयोमर्यादा १८ ते ३५ वर्षे.



Scanned with OKEN Scanner

८. **ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सद्यस्थितीत कार्यान्वित E-Mail Id व चालु भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक राहील.**

९. शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी. व आय.टी.आय. गुणांच्या टक्केवारीनुसार तसेच सामाजिक आरक्षणाच्या अधिन राहुन प्रवर्गनिहाय केली जाईल.

१०. आरक्षणाचा लाभ घेणा—या उमेदवारांस वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या शासनाच्या नियमाप्रमाणे आरक्षणासंबधीत कागदपत्राची मागणी केल्यास ते सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

११. तसेच उमेदवारांनी संकेत स्थळावर दि. ०६.०८.२०२६ ते १२.०८.२०२६ या दरम्यान Online Registration (http// www.apprenticeshipindia.org) ची नोंदणी केल्याची प्रत तसेच या जाहीर सुचने सोबत जोडलेला अर्ज भरून त्या सोबत शैक्षणिक अर्हता धारण केल्याची गुणपत्रिका /प्रमाणपत्राची छायांकित प्रत व वर नमुद कागदपत्रे कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय अऊदा संवसु विभाग, म.रा.वि.पा.कं.मर्या. **''विद्युत भवन'' दुसरा मजला, आर्णि रोड, यवतमाळ — ४४५००१** या पत्यावर दि. १८.०८.२०२६ पर्यंत पोस्टाने / स्वहस्ते कार्यालयीन वेळेत पोहचेल या बेताने पाठविणे अनिवार्य आहे. **व दि. १८.०८.२०२६ नंतर पोस्टाने / स्वहस्ते प्राप्त होणा—या अर्जाचा भरती प्रक्रिये करीता विचार केला जाणार नाही तसेच सदर अर्ज भरती प्रक्रियेतुन बाद केल्या जातील याची नोंद घ्यावी.**

**सहपत्र:—** अर्जाचा नमुना.

(राजु रा. भोयर)
कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग म.रा.वि.पा.कं.मर्या.
यवतमाळ

Scanned with OKEN Scanner

**म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीच्या कार्यकारी अभियंता, अऊदा संवसु विभाग, यवतमाळ या कार्यालयाने दिलेल्या जाहिरातीस अनुसरून करावयाचा अर्ज.**

| उमेदवाराने अलिकडे काढलेला पासपोर्ट साईजचा फोटो येथे चिटकवावा व त्यावर स्वाक्षरी करावी (स्टेपल किंवा पीन लावू नये) |
|---|

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे पुर्ण नाव | _____<br>(आडनाव) (उमेदवाराचे नाव) (वडीलांचे/पतीचे नाव) |
| २ | उमेदवाराच्या वडीलांचे पुर्ण नाव | _____<br>(आडनाव) (वडीलांचे नाव) (आजोबांचे नाव) |
| ३ | लिंग व वैवाहिक स्थिती | _____ _____ _____ _____<br>स्त्री (Female) पुरूष (Male) विवाहीत (Married) अविवाहीत (Unmarried) |
| ४ | उमेदवाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता | _____<br>_____<br>_____<br>पिन कोड |
| ५ | उमेदवाराचा कायमचा पत्ता | _____<br>_____<br>_____<br>पिन कोड |
| ६ | दूरध्वनी/मोबाईल क्र. | _____<br>कोड—दूरध्वनी क्र. मोबाईल क्र. |
| ७ | ई—मेल आयडी | |
| ८ | जन्म दिनांक | दिनांक / महिना / वर्शे |
| ९ | जतीचा प्रवर्ग (लागू असलेल्या ठिकाणी ( √ ) अशी खूण करावी) | अनु. जाती (SC) / अनु. जमाती (ST) / विजा (अ) (VJ-A) / भज (ब) (NT-B) / भज (क) (NT-C) / भज (ड) (NT-D) / विमाप्र (SBC) / इमाव (OBC) / ई. डब्लू. एस. (EWS) / स. शै. दु. प्र (SEBC) / खुला (OPEN) |
| १० | क) एस.एस.सी. गुणपत्रिका जोडली आहे का? | होय / नाही |
| | ख) आय.टी.आय गुणपत्रिका जोडली आहे का? | होय / नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| | ग) शाळा सोडल्याचा दाखला सोबत जोडला आहे का? | होय | नाही |
| | घ) आधार कार्ड सोबत जोडले आहे का? | होय | नाही |
| | च) महाराष्ट्र शासनाने प्राधिकुत केलेल्या सक्षम प्राधीका—याचा जातीचा दाखला जोडले आहे का? | होय | नाही |
| | छ) उन्नत / प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non creamy layer) जोडले आहे का? (SC/ST सोडुन) | होय | नाही |
| | ज) महाराष्ट्र राज्याचे रहीवासी असल्याचे शासनाचे प्रधिकृत केलेल्या सक्षम अधिका—याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile) जोडले आहे का? | होय | नाही |
| | झ) आर्थिक दृष्टया मागास प्रवर्ग (EWS) करिता तहसीलदार यांनी दिलेले प्रमाणपत्र आहे का? | होय | नही |

| ११ | **शैक्षणिक पात्रता: प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती जोडाव्यात** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | परिक्षेचे नांव | शाळा / मंडळ / विद्यापीठ / संस्थेचे नांव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेले एकुण गुण | मिळालेली टक्केवारी | श्रेणी |
| १ | एस.एस.सी. (१० वी) | | | | | |
| २ | औद्योगिक प्रशिक्षण संसथेतुन विजतंत्री या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र | | | | | |

**<u>प्रतिज्ञापत्र</u>**

मी असे प्रमाणित करतो / करते की, म.रा.वि.पा.कं.मर्यादित या कंपनीच्या कार्यकारी अभियंता, अऊदा संवसु विभाग, यवतमाळ यांच्या कार्यालयाने प्रस्तुत दिलेली जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असुन ती मला समजली आहे. सदर जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी, संपूर्ण व योग्य असुन ती चुकीची वा खोटी आढळून आल्यास माझी उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कारावाईस पात्र राहील, याची मला पूर्णपणे जाणीव आहे. तसेच, मी सादर केलेली कोणतीही माहिती निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर खोटी अथवा बनावट आढळून आल्यास मला निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१. मी असेही प्रमाणीत करतो / करते की, माझी निवड झाल्यास मी कंपनीच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही ठिकाणी रूजू होण्यास तयार आहे.
२. मी असे प्रमाणीत करतो / करते की, जाहिरातीत विहीत केलेल्या अटी व शर्ती व निवडप्रक्रिया मला मान्य राहतील.

**स्थळ :**

**दिनांक :**

**उमेदवाराची स्वाक्षरी**